# उपनिबंधक, सहकारी संस्था, आर-दक्षिण विभाग, मुंबई यांचे कार्यालय

३०३, अे विंग, ३ रा मजला, बी.एम.सी.गोडाऊन इमारत, संस्कृती कॉम्प्लेक्स जवळ, ठाकूर कॉम्प्लेक्स
९० फुट रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई - ४०० १०१.

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अे) अन्वये आदेश

जा.क्र.मुंबई/उपनि/ आर दक्षिण / 9420 /२०१८
दिनांक ०८ /०५/२०१८.

वाचावे : १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) मधील तरतूद.
२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८९ (अ) अन्वये दिनांक १०.०४.२०१८ रोजीचे आदेश.
३. तपासणी अधिकारी यांचेकडील दिनांक १६.०४.२०१८ रोजीचा अहवाल.
४. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये दि.१६.०४.२०१८ रोजीची नोटीस.

ज्याअर्थी, **क्रिस्टल एव्हेन्यु ए को ऑप हौ सोसा लि., सीटीएस नं. ७९२ (१ ते ४) दत्तानी पार्क रोड, गणपती टॉवरच्या बाजूला, ठाकूर व्हिलेज, कांदिवली (पुर्व) मुंबई-१०१** ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ अन्वये नोंदविण्यांत आलेली असून तीचा नोंदणी क्रमांक **बीओएम/डब्ल्युआर/एचएसजी/टीसी/१०९९८/२०००-२००१** दिनांक **२५.१०.२०००** असा आहे आणि,

ज्याअर्थी **क्रिस्टल एव्हेन्यु ए को ऑप हौ सोसा लि., सीटीएस नं. ७९२ (१ ते ४) दत्तानी पार्क रोड, गणपती टॉवरच्या बाजूला, ठाकूर व्हिलेज, कांदिवली (पुर्व) मुंबई-१०१** (यापुढे संस्था असे वाचावे) या संस्थेचे कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० (यापुढे अधिनियम असे वाचावे), महाराष्ट्र सहकारी संस्थांचे नियम १९६१ (यापुढे नियम असे वाचावे), व संस्थेच्या नोंदणीकृत उपविधी व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय व परिपत्रकामधील तरतूदीस अनुसरुन कामकाज करणे आवश्यक आहे. आणि,

ज्याअर्थी, वरील संस्था बृहन्मुंबईच्या आर दक्षिण विभागात कार्यरत असल्याने त्या संस्थेचे निबंधक, उपनिबंधक, सहकारी संस्था, आर दक्षिण विभाग, मुंबई हे आहेत आणि,

ज्याअर्थी, श्री.तारापुरवाला यांनी संस्थेच्या कार्यालयीन कामकाजाबाबत मा. सहकार आयुक्त व निबंधक यांचेकडे तक्रार दाखल केलेल्या असल्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८९ (अ) दिनांक १०.०४.२०१८ च्या आदेशान्वये श्री. एस बी गायकवाड, सहकारी अधिकारी श्रेणी-२ यांची नियुक्ती करण्यात आलेली होती. सदर आदेशाच्या अनुषंगाने तपासणी अधिकारी यांनी संस्थेच्या दप्तराची तपासणी घेऊन तसा अहवाल संदर्भ क्र ३ च्या पत्राने या कार्यालयास सादर केलेला आहे. सदर अहवालाची छाननी केली असता संस्थेची निवडणूक माहे डिसेंबर २०१३ मध्ये झालेली असून सदर व्यवस्थापक समितीमध्ये वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक १०.१२.२०१७ च्या सभेमध्ये श्रीमती राधा नायर व श्रीमती ख्याती अर्पित शहा तसेच इतर ०२ समिती सदस्यांना को ऑप केलेले आहे. आणि,

ज्याअर्थी, संस्थेने माहे डिसेंबर २०१३ मध्ये संचालक मंडळाची रचना ०५ सदस्यांची असून त्यानंतर ०४ समिती सदस्यांना स्विकृत करुन नियुक्ती केलेली आहे. सबब ९७ व्या घटना दुरुस्ती झाल्या नंतर व्यवस्थापक समितीमध्ये को ऑप करण्याची तरतूद नसतानाही ०४ समिती सदस्यांना को ऑप करण्यात आल्याचे दिसून येत आहे. आणि,

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये ९७ व्या घटना दुरुस्ती नुसार बदल करण्यात आलेले असून सदरची दुरुस्ती दिनांक १४.०२.२०१३ च्या अधिसूचनेव्दारे संपुर्ण महाराष्ट्रामध्ये लागू करण्यात आलेली आहे. सदर अधिसूचनेव्दारे सहकारी संस्थांच्या निवडणूका घेणेसाठी मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य पुणे यांची शासन अधिसुचना दिनांक ३०.०३.२०१३ च्या आदेशान्वये स्थापना करण्यात आलेली असून महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ दिनांक ११.०९.२०१४ अन्वये अधिसुचित करण्यात आलेले आहे. असे असतानाही संस्थेने स्व:ताच्या अधिकारात वार्षिक सर्वसाधारण सभेत स्विकृत सदस्य नियुक्त केलेले असून माहे डिसेंबर २०१३ मध्ये व्यवस्थापक समितीची रचना केलेली असून ती कायदा व नियमाच्या विरुध्द आहे. आणि,

ज्याअर्थी, माहे डिसेंबर २०१३ मध्ये नवीन समितीचे गठन करण्यात आलेले असतानाही मध्यांतरी ०४ समिती सदस्यांना को ऑप केलेले असून त्यास शासनाची मान्यता घेण्यात आलेली नाही. तसेच श्री. सुभाष कनोजीया सचिव, यांच्या नियुक्तीस त्यांनाचा मान्यता घेण्यात आलेली नसल्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ (कब) (१४) नुसार प्रत्येक सहकारी संस्थेने राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाला किंवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयात, तिची मुदत समाप्त होण्याच्या किमान सहा महिन्यापूर्वी आपला पदावधी संपण्यांबाबत कळविण्यांची तरततुद आहे तसेच समितीच्या किंवा तिच्या पदाधिकाऱ्यामध्ये निर्माण झालेल्या कोणत्याही रिक्त पदाबाबत असे रिक्त पद निर्माण झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आंत कळविणेतची तरतूद आहे आणि,

Scanned by CamScanner

ज्याअर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ आय (२) नुसार समितीने तिची निवडणूक घेण्यासंबंधी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाला कळविण्यांस हेतुपुरस्सर कसूर केली असेल, तर आणि त्यामुळे कोणत्याही कारणास्तव, मुदत संपण्यापूर्वी समितीची निवडणूक घेता आली नसेल तर, समितीचे सदस्य त्यांचे अधिकारपद धारण करण्यांचे बंद करतील आणि अशा परीस्थितीत निबंधक अधिनियमाच्या कलम ७७ अ अन्वये कारवाई करणेची तरतूद आहे आणि,

ज्याअर्थी, व्यवस्थापक समिती, संस्थेतील सदस्याच्या हितास बाधक होईल अशी कृती करीत असल्यामुळे तसेच मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकारणाने सहकार अधिनियमाच्या तरतूदी अन्वये विहित मुदतीमध्ये निवडणूक घेणेस कसूर केलेली आहे आणि,

ज्याअर्थी, ज्यावेळेस समितीची मुदत वाढविली नसेल किंवा वाढविल्यानंतर सुध्दा निवडणूक घेतली नसेल त्यामुळे नवीन समिती नेमली गेली नसेल अशावेळेस निबंधकाने प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करणेसाठी योग्य ती पावले उचलावयास पाहिजेत. समितीचा कालावधी ज्याक्षणी संपतो, त्यावेळेस व्यवस्थापन समितीचा कालावधी समाप्त होतो, त्यामुळे अशा समितीस पुढील काळासाठी काम करण्यांचा अधिकार प्राप्त होत नाही. याच कारणासाठी समितीचे म्हणणे ऐकूण घेण्यांची जरूरी नाही अशी तरतुद आहे आणि,

ज्याअर्थी, संस्थेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये प्राधिकृत अधिकारी का नियुक्त करण्यात येऊ नये? याबाबतचा लेखी व तोंडी खुलासा सादर करण्यासाठी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना या कार्यालयात दि.०३.०५.२०१८ रोजी सुनावणी ठेवण्यात आली सदर सुनावणी वेळी संस्थेचे चेअरमन श्री लालबहादूर टक्कर, श्री दयानंद शेट्टी, श्री [illegible], श्री.नितीन हळदीकर, श्री जयप्रकाश राणे व श्रीमती राधा नायर हे व्यवस्थापक समिती सदस्य तसेच तक्रार श्री.तारापूरवाला उपस्थित होते.सदर सुनावणी वेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी संस्थेची सन २०१३ मध्ये निवडणूक झाली होती. दि.१५.०८.२०१७ रोजी [illegible] सेक्रेटरी यांनी राजीनामा दिल्याने नविन सेक्रेटरी यांची निवड करण्यात आली. अगोदरच्या सदस्यांनी राजीनामा दिल्याने सभासदांनी आपसात निवड करुन सभासद स्विकृत केले आहेत.

ज्याअर्थी, व्यवस्थापक समितीची निवडणूक माहे डिसेंबर २०१३ रोजी केलेली असून ती कायदा व नियमाचे उल्लंघन करुन केलेली असल्याने ते अवैध आहे. व्यवस्थापक समितीचा कालावधी समाप्त झालेला असतानाही आपण जाणीवपूर्वक निवडणूक घेणेसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे सादर करण्यास तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ (आय) मध्ये विनिर्दिष्ट करण्यांत आल्याप्रमाणे, व्यवस्थापक समितीची मुदत संपण्यापूर्वी समितीची रचना करण्यासाठी. निवडणूक घेण्याकरिता आवश्यक व्यवस्था करण्यास कसुर केलेली आहे अशी माझी खात्री झालेली असून संस्थेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये प्राधिकृत अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे क्रमप्राप्त झालेले आहे. आणि,

त्याअर्थी, मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

# आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी डॉ.अविनाश भागवत, उपनिबंधक, सहकारी संस्था आर-दक्षिण विभाग मुंबई, **क्रिस्टल एव्हेन्यु ए को ऑप हौ सोसा लि.**, सीटीएस नं **७९२ (१ ते ४) दत्तानी पार्क रोड, गणपती टॉवरच्या बाजूला, ठाकूर व्हिलेज, कांदिवली (पुर्व) मुंबई-१०१** या संस्थेवर संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहाण्यासाठी तसेच सुयोग्य व्यवस्थापनासाठी **श्री.नितीन पवार, प्रमाणित लेखापरीक्षक** यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे त्यांनी संस्थेच्या दैनंदिन कामकाज पाहून मुदतीत निवडणूक घेण्याची कार्यवाही करावी.

सदर आदेश आज दि.०८/०५/.२०१८ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी देत आहे.

(डॉ. अविनाश भागवत),
उपनिबंधक,
सहकारी संस्था, आर दक्षिण विभाग, मुंबई

Scanned by CamScanner

प्रत :

१) अध्यक्ष / सचिव, क्रिस्टल एव्हेन्यु ए को ऑप हौ सोसा लि., सीटीएस नं. ७९२ (१ ते ४) दत्तानी पार्क रोड, गणपती टॉवरच्या बाजूला, ठाकूर व्हिलेज, कांदिवली (पुर्व) मुंबई-१०१

२/- आपणांस कळविण्यांत येते की संस्थेच्या दप्तराचा ताबा नवनियुक्त प्राधिकृत अधिकारी यांचेकडे सूपूर्द करावा.

२) प्राधिकृत अधिकारी श्री.नितीन पवार, प्रमाणित लेखापरीक्षक, महावीर जैन को.ऑप.हौसिंग सो.लि., शंकर लेन, कांदिवली (प). मुंबई ४०००६७

२/- यांना कळविण्यांत येते की, त्यांनी संस्थेच्या पदाधिकारी यांचेकडून संस्थेच्या दप्तराचा ताबा घेवून तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

३) श्री पी डी तारापूरवाला अर्जदार, सदनिका क्र. ३०१/३०२, क्रिस्टल एव्हेन्यु ए को ऑप हौ सोसा लि., सीटीएस नं. ७९२ (१ ते ४) दत्तानी पार्क रोड, गणपती टॉवरच्या बाजूला, ठाकूर व्हिलेज, कांदिवली (पुर्व) मुंबई-१०१

४) चेअरमन/व्यवस्थापक, दि मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, कांदीवली

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

१. मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य पुणे

२. मा.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था मुंबई विभाग मुंबई

३. मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (४) मुंबई

४. निवड नस्ती.

उपनिबंधक,
सहकारी संस्था, आर दक्षिण विभाग, मुंबई

O/C

Scanned by CamScanner